नि.दि.दा.क्र.१०१/२०१८
नि.क्र.१८५

<u>पुढील सरतपास प्रतिवादी क्र.१ करीता विधीज्ञ श्री. शेख यांच्या वतीने शपथेवर सुरु</u> -

१. माझ्या सरतपासातील मजकुर मी सांगितल्याप्रमाणे तयार करण्यात आले. ते मजकुर खरे व बरोबर आहे. प्रतिवादी क्र.१ मार्फत नि.क्र.१८१ व नि.क्र.१८४ खाली काही कागदपत्र दाखल करण्यात आलेले आहेत. आता मला नि.क्र.१८१/१ ते नि.क्र.१८१/३ व नि.क्र.१८१/६ वरील दस्त दाखविले असता त्यातील मजकुर मी सोबत आणलेल्या कार्यालयीन अभिलेखाप्रमाणे खरा व बरोबर आहे. (या क्षणाला वादीचे विधिज्ञ श्री.काळे यांनी साक्षीदाराने जे कार्यालयीन अभिलेख आणलेले आहे ते सर्व नि.क्र.१८१/१ ते नि.क्र.१८१/३ व नि.क्र.१८१/६ वरील दस्ताच्या प्रती असून त्या कार्यालयीन प्रती नाही आणि साक्षीदाराने आणलेल्या प्रतींवर प्रतिवादी क्र.१ यांच्या कार्यालयाचा मुळ शिक्का आणि संबंधित दस्तावर तत्कालीन अधिका-याच्या मुळ सहया नसल्याचे सांगितले. साक्षीदाराकडून त्यांनी सोबत आणलेले अभिलेख तपासून पाहिले असता ते दस्त नि.क्र.१८१/१ ते नि.क्र.१८१/३ व नि.क्र.१८१/६ वरील दस्तांच्या प्रती असल्याचे आढळून आले. कार्यालयीन प्रतींवर देखील शासकिय कार्यालयाचा शिक्का असतो आणि सही करणा-याची मुळ सही असते. मुळ दस्त जरी विरोधी पक्षाला देण्यात आला असला तरी कार्यालयीन प्रतींवर मात्र शासकिय कार्यालयाचा शिक्का आणि मुळ सही असणे आवश्यक असते. त्यामुळे नि.क्र.१८१/१ ते नि.क्र.१८१/३ व नि.क्र.१८१/६ वरील दस्तांना निशाणी क्रमांक देता येणार नाही.)

२. आता मला नि.क्र.१८१/७ वरील दि.२८/०५/२०१८ रोजीच्या पत्राची साक्षांकित प्रत दाखविली असता त्यातील मजकूर मी सोबत आणलेल्या अभिलेखावरील त्या पत्राच्या कार्यालयीन प्रतप्रमाणे खरे व बरोबर आहे. त्यावर प्रतिवादी क्र.१ यांच्या कार्यालयाचा शिक्का व तत्कालीन मुख्याधिकारी यांची सही आहे. सदर पत्र **<u>नि.क्र.१८६</u>** वर आहे. आता मला नि.क्र.१८४/१ व २ वरील स्थानिक टपाल पुस्तकाची साक्षांकित प्रत दाखविली असता त्यातील मजकूर मी सोबत आणलेल्या मुळ अभिलेखाप्रमाणे खरे व बरोबर आहे. त्यावर प्रतिवादी क्र.१ यांच्या कार्यालयाचा शिक्का व संबंधित इसमाची सही आहे. सदर दोन्ही दस्त **<u>नि.क्र.१८७</u>** व **<u>नि.क्र.१८८</u>** वर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास प्रतिवादी क्र.२ करीता विधिज्ञ श्री.दिलीप औताडे यांनी नाकारला.**

**उलटतपास वादी करीता विधिज्ञ श्री. काळे यांच्यावतीने सुरु-**

३. मी माहे मे-२०२५ पासून प्रतिवादी क्र.१ कार्यालयात नगररचना सहाय्यक या पदावर नेमणूकीस आहे. या दाव्यात प्रतिवादी क्र.१ यांच्यावतीने साक्ष देण्याकरीता कार्यालयाने मला लेखी अधिकार पत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ ते २०१८ या काळात प्रतिवादी क्र.१ यांनी वादीस कश्या संदर्भात नोटीसा दिल्या आणि वादीने हा दावा का दाखल केला या बाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, या दाव्यासंबंधी दाखल केलेले कागदपत्र आणि त्या कागदपत्रा संबंधीची माहिती प्रतिवादी क्र.१ कार्यालयाने माझ्यासमक्ष दिलेली नव्हती.

४. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियतीमध्ये काय नमूद केले या बाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांनी कैफियतीमध्ये नमूद केलेल्या घटना व त्या कथनांबाबत मला प्रत्यक्ष माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ यांच्या वतीने दाखल केलेल्या कैफियतीवर कोणी सही केली आणि कोणी दिलेल्या माहितीवरुन ती कैफियत तयार करण्यात आली त्या अधिका-यांचे नाव मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासात नमूद दि.०१/०२/२०१८ व दि.०२/०६/२०१८ रोजीच्या घटना माझ्यासमक्ष घडलेल्या नाहीत.

५. दावा मिळकतीच्या बांधकामा संदर्भात आधीच्या परवानगीबाबत मला माहिती नाही. दावा मिळकतीच्या बांधकामा संदर्भात प्रतिवादी क्र.१ यांनी परवानगी दिली होती किंवा नाही, या बाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकतीचे पूर्वीची मालक गंगूबाई एकनाथ पुजारी होती किंवा नाही, या बाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासात नमूद परिच्छेद क्र.२ व ३ मध्ये नमूद नोटीसांबाबत प्रतिवादी क्र.१ कार्यालयाने काय कारवाई केली, या बाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१८६ वरील पत्रावर ते पत्र संबंधित पोलीस स्टेशनला मिळाल्याबाबत त्यावर तशी पोहोच नाही.

६. हे म्हणणे खरे आहे की, **नि.क्र.१८६** वरील पत्राच्या अनुषगांने पोलीसांनी

तशी मदत पुरविली किंवा नाही या बाबत मला माहित नाही. सन २०१८ मध्ये प्रतिवादी क्र.१ कार्यालयाचे मुख्याधिकारी कोण होते त्यांचे नाव मला माहित नाही. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१८ मध्ये प्रतिवादी क्र.१ कार्यालयाचे मुख्याधिकारी कोण होते त्यांच्या नावाबाबत मी माहिती घेतली नाही. माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र कोणत्या टंकलेखककाकडे टंकलिखीत करण्यात आले त्या बाबत मी माहिती घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र टंकलिखीत करतेवेळेस मी त्या ठिकाणी हजर नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र टंकलिखीत करतेवेळेस मी कागदपत्रांवरुन माहिती देत नव्हते.

७. हे म्हणणे खरे नाही की, नि.क्र.१ वरील वादीची सही आणि **नि.क्र.१८७** वरील पत्र क्र.३६१९ समोरील सही या दोन्ही सहया सारख्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.९२ वरील सदर इसमाची सही आणि **नि.क्र.१८७** वरील पत्र क्र.३६१९ समोरील सदर इसमाची सही या दोन्ही सहया सारख्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र प्रतिवादी क्र.१ कार्यालयाच्या वकीलांनी तयार केले, मी त्यावर सही केली आणि न्यायालयाच्या अधिक्षकांसमक्ष शपथ घेवून न्यायालयात दाखल केले. प्रतिज्ञापत्रात नमूद केल्याप्रमाणे तशी कारवाई कधीही झालेली नव्हती, या बाबत मला माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत ही कोणाच्या मालकीची आहे या बाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपसातील संपूर्ण मजकूराचे मी खोटे कथन केले. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा मिळकतीबाबत कोणतीही माहिती नाही.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,

ASHISH BIHARILAL MARLECHA

Digitally signed by ASHISH BIHARILAL MARLECHA
Date: 2026.03.07 14:28:04 +0530

(आशिष बि. मरलेचा)

दिनांक ०६/०३/२०२६

दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
श्रीरामपुर, जि.अहमदनगर